**DR. VIKAS MAHATME**
Member of Parliament (Rajya Sabha)
Padmashri Awarded Eye Specialist
**Member**
- Standing Committee on **Coal and Steel**
- Consultative Committee on **Railway**
- Committee on **Subordinate Legislation**
- **Indian Nursing Council**

सत्यमेव जयते

**डॉ. विकास महात्मे**
सांसद (राज्य सभा)
पद्मश्री पुरस्कृत नेत्रतज्ञ
**सदस्य**
- **कोयला एवं इस्पात** स्थायी समिति
- **रेल्वे** सलाहाकार समिती
- **अधीनस्थ विधान** संबंधी समिती
- **भारतीय नर्सिंग काउंसिल**

जा.क्र. 1207
दि. 11.08.2021

प्रती,

**ना.ॲड. अनिलजी परब**
मा.मंत्री परिवहन व संसदीय कार्य
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**विषय: केंद्रीय मोटार वाहन दुरुस्ती कायदा 2019 च्या तरतुदी महाराष्ट्र राज्यात लागू करण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने प्रकल्प संचालक, बिगर सरकारी संस्था (NGO) "परिसर", पुणे कडून निवेदन प्राप्त झाले आहे. त्यात नमूद केल्यानुसार सुधारित मोटार वाहन कायदा - 2019 चे कलम 200 अन्वये शासनाकडून अधिसूचना काढण्याची मागणी केलेली आहे. रस्ते अपघातात लोकांचे प्राण वाचविण्यास व वाहतुकीत सुधारणा होण्यास यामुळे मदत होईल असे त्यांनी सुचविले आहे. आपले संदर्भासाठी सदर निवेदन जोडलेले आहे.

कृपया आपले स्तरावरून रस्ते वाहतुकीत सुधारणा होण्याचे दृष्टीने, लोकहितार्थ सदर निवेदनावर उचित कार्यवाही व्हावी, ही विनंती.

**(डॉ. विकास महात्मे)**

"डॉ.बाबासाहब के स्वप्न को संपूर्ण साकार करने का संकल्प"

**New Delhi** : C-704, Swarna Jayanti Sadan, Near RML Hospital, Dr. B.D. Marg, New Delhi - 110 001. Tel : 011-23724788
**Nagpur** : 16, Central Excise Colony, Ring Road, Chhatrapati Sq., Nagpur - 440 015 (**Maharashtra**).
Tel : 0712-2222556 / 3 Fax : 0712-2242202 Mobile : +91 9975590908 / 8888277722 Email : **mp.mahatme@sansad.nic.in**
Eye Care Services Available At - **Nagpur I Mumbai I Pune I Amravati I New Delhi I Armori (Gadchiroli)**

परिसर

Parisar Sanrakshan Sanwardhan Sanstha
परिसर संरक्षण संवर्धन संस्था

**Parisar**
'Yamuna', I.C.S. Colony,
Ganeshkhind Road,
Pune 411 007
Tel.: (020) ~~25512122~~ 29701004

**परिसर**
'यमुना', आय.सी.एस.कॉलनी,
गणेशखिंड रोड,
पुणे ४११ ००७
दूरध्वनी : (०२०) ~~२५५१२१२२~~ २९७०१००४

Email: info@parisar.org
Web.: www.parisar.org

Pari/26/2021/P
२८/७/२०२१

मा. श्री. डॉ. विकास महात्मे,
खासदार, राज्य सभा,
नागपूर, महाराष्ट्र

**रस्ता सुरक्षा - मोटार वाहन (दुरुस्ती) कायदा त्वरित लागू करणे.**

परिसर तर्फे नमस्कार !

परिसर ही बिगर सरकारी संस्था असून गेली ४ दशके शाश्वत वाहतूक व्यवस्था या विषयावर कार्य करत आहे. परिसर संस्थेने मोटर वाहन (दुरुस्ती) कायदा पारित करण्यासाठी आग्रही भूमिका पार पाडली. परिसर पुणे जिल्हा रस्ता सुरक्षा समितीत सभासद देखील आहे.

भारतीय संसदेने, ऑगस्ट २०१९ मध्ये मोटार वाहन (दुरुस्ती) कायदा पारित केला. या घटनेला आज जवळपास २ वर्ष झाली आहेत. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या "स्वप्नवत भारत" या मोहिमे अंतर्गत मोटार वाहन (दुरुस्ती) कायदा हा एक अति महत्वाचा कायदा आहे. तसेच, माननीय नितीन गडकरीजी (रस्ते परिवहन आणि महामार्ग) यांच्या अथक प्रयत्नाने साकार केलेला आणि रस्ते सुरक्षा समस्यावरील त्रुटी, उणीवा संपुष्टात आणणारा महत्वपूर्ण कायदा आहे. तरी देखील, आम्हास कळविण्यास अत्यंत दुःख होते की, महाराष्ट्र महाविकास आघाडी सरकारने हा कायदा राज्यात लागू केलेला नाही ज्यासाठी मोटार वाहन कलम २०० अन्वये शासन अधिसूचना जारी करणे गरजेचे आहे.

मोटार वाहन कायदा कलम २०० नुसार, राज्य सरकार यांस वाहतुक नियम उल्लंघनाच्या संबंधित दंड वसूल करण्याचे अधिकार आहेत ज्यायोगे वाहतूक पोलीसांना नियम उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याची मुभा दिली जाते. परंतु सुधारित मोटार वाहन कायद्यानुसार कलम २०० अंतर्गत अधिसूचना जारी केली नाही. महाराष्ट्र सरकारने, वर्ष २०१६, मध्ये वाहतूक नियम उल्लंघन आणि दंडाची रक्कम याबाबतीत अधिसूचना जारी केलेली आहे जी कालबाह्य दंडाची रक्कम दर्शविते व ज्यात रस्ता सुरक्षाच्या दृष्टिकोनातून महत्वाचे अनेक गुन्हे यांचा उल्लेख नाही आहे.

नवीन दंड आकारण्यासंबंधी अधिसूचना जारी करण्यात महाविकास आघाडी सरकार अपयशी ठरले आहे. तथापि, महाविकास आघाडी सरकारचा हा नाकर्तेपणा आहे. महाराष्ट्रात दरवर्षी १३,००० लोकांचे रस्ते अपघातात मृत्यू होतात. कोरोना टाळेबंदी नियम शिथिल केल्यानंतर मोठ्या प्रमाणात रस्ते अपघात घडत आहेत ज्यात रस्त्यावर निरपराध लोकांचा बळी जात आहे. मोटार वाहन दुरुस्ती कायदा अस्तित्वात आल्यानंतर २ वर्ष झाले व त्यावर महाविकास आघाडी सरकारने कार्य केले नाही. मोटार वाहन कायद्याच्या कलम २०० नुसार नवीन दंड देणे आवश्यक आहे. निरपराध जीव गमावणे महाराष्ट्राला परवडणारे नाही.

जवळपास 30 वर्षांनंतर मोटार वाहन कायद्यात सुधारणा करण्यात आली आहे. गेली तीस वर्षे कोणत्याही पक्षाच्या सरकार यांनी रस्ते सुरक्षे बाबतीत गंभीरता दाखविली नाही. केवळ भारतीय जनता पक्षाने रस्ता सुरक्षा समस्येबाबत अमूलाग्र बदल केले आहेत. भारतीय जनता पक्षाच्या सरकारने वर्ष २०१९ मध्ये मोटर वाहन (दुरुस्ती) कायदा केला. परंतु महाराष्ट्र राज्य सरकारने अधिसूचना न काढल्यामुळे हा कायदा महाराष्ट्रात लागू नाही हि शरमेची बाब आहे.

म्हणून आम्ही आपल्याला नम्र विंनती करतो:

Registered Under Societies Registration Act 1860 - No. MAH/3478/87/Pune 13 October 1987
Registered Under Bombay Public Trust Act 1950 - No. F-4598 2 December 1987

१. हेल्मेट, सीटबेल्टचा वापर आणि वेग वाढविणे यासारख्या रस्ते सुरक्षेशी संबंधित असलेल्या गुन्ह्यांसाठी दंड वाढविण्याकरिता, विविध वाहतूक गुन्ह्यांसाठी दंड निश्चित करण्यासाठी मोटार वाहन अधिनियम २०० च्या अधिसूचनेनंतर राज्य सरकारने त्वरित अधिसूचना जारी करावी यासाठी राज्य सरकार यांना प्रवृत्त करावे.

२. त्यानंतरच्या अधिसूचनेद्वारे हळू हळू दंड वाढविण्यास मदत करावी

3. वाहन परवाना प्रक्रिया (Licensing system) सदोष बनवावी.

तथापि, सुरक्षित रस्ते वापरकर्ते तयार करण्यासाठी दंड हा केवळ एक घटक आहे. चांगल्या अंमलबजावणीची प्रक्रिया जी पकडण्याची शक्यता वाढवते आणि नियम आणि नियमांचे पालन सुधारण्यात मदत करते. अंमलबजावणी दृश्यमान असते तेव्हा उत्कृष्ट कार्य करते (लोक नियमांच्या अंमलबजावणीसाठी कायद्याच्या अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडून इतरांना पकडताना दिसतात), सातत्यपूर्ण आणि सतत नियमांच्या अंमलबजावणी केल्यास लोकांच्या मानसिकतेत अपेक्षित बदल होतात.

सर्व राज्ये यापूर्वीच माननीय सर्वोच्च न्यायालयाने रस्ता सुरक्षाविषयक समिती नेमलेल्या कडक आदेशांच्या अधीन आहेत. रस्ते सुरक्षेच्या मुद्द्यांकडे लक्ष देण्यासाठी इतर राज्य सरकारे यांनी यापूर्वीच काही धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत. बऱ्याच राज्यांनी उदाहरणार्थ दिल्ली, उत्तर प्रदेश, पंजाब, कर्नाटक, उत्तराखंड, गुजरात, आसाम इत्यादी अशा प्रकारची अधिसूचना जारी केलेली आहे.

याबाबतीत आम्ही २ वेळा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे पण त्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. आम्ही महाराष्ट्रा परिवहन मंत्री यांना तीन वेळा पत्रही लिहिले आहे आणि अनेकदा वैयक्तिक भेट घेतली आहे, परंतु त्यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. काही धोरणे हि प्रथमदर्शी लोकप्रिय नसतात, परंतु सत्तेत असले कि लोकहित आणि लोकप्रियता याचे ताळमेळ ठेवणे हि मोठी जबाबदारी असते.

भारतीय राज्यघटनेनुसार विरोधी पक्ष हा लोकशाही प्रक्रियेत महत्त्वाचा घटक आहे. विरोधी पक्षाचे प्रतिनिधी, म्हणून आम्ही ही आपणास विनंती करत आहोत की आपण यामध्ये हस्तक्षेप करुन महाराष्ट्रातील जनतेचे रस्ते अपघातातील प्राण वाचवावे.

सदर विषयासंबंधी आपणास भविष्यात भेटू इच्छितो.

धन्यवाद

संदीप गायकवाड,

वरिष्ठ प्रकल्प सहाय्यक,

परिसर, पुणे.

Cc:

श्री. नितीन गडकरी, (केंद्रीय मंत्री, रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्रालय) नवी दिल्ली

श्री. देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र